# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांचे अंशदायी निवृत्तीवेतन प्रलंबित असल्याबाबत

**(१) ५५५० (१४-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेंतर्गत आंतरजिल्हा बदलीने स्वजिल्ह्यात दाखल झालेल्या राज्यातील ४ हजार प्राथमिक शिक्षकांच्या अंशदायी निवृत्तीवेतनाचा प्रश्न प्रलंबित असून सुमारे ३५ कोटी रूपयांची रक्कम शासनाने प्रलंबित ठेवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शिक्षकांच्या अंशदायी निवृत्तीवेतनाचा प्रश्न प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१२-०८-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीने मूळ जिल्ह्यात बदली झालेल्या शिक्षकांच्या पूर्वीच्या कार्यरत जिल्हा परिषदेकडून अंशदायी निवृत्ती वेतनाची अंतिम हिशोब पत्रिका तसेच मूळ संचिका बदली झालेल्या जिल्हा परिषदेकडे प्राप्त न झाल्याने, तत्संबंधित कार्यवाही प्रलंबित आहे. पूर्वीच्या कार्यरत जिल्हा परिषदेकडून बदली झालेल्या जिल्हा परिषदेकडे सदरची माहिती प्राप्त झालेली आहे, अशा जिल्हा परिषदांकडून निधी वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे. तर काही जिल्हा परिषदेकडून निधी वर्ग करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गीय उमेदवारांच्या आरक्षणासाठी इंम्पेरीकल डाटा गोळा करण्याबाबत

**(२) १४३२३ (२७-०६-२०२२) श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखीव असलेल्या २७ टक्के जागांवर निवडणूक घेण्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास स्थगिती दिली असून तयार केलेला समर्पित राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल देखील मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ओबीसी आरक्षणासाठी आवश्यक असलेला इंम्पेरीकल डाटा गोळा करण्याची कार्यवाही शासनाने पूर्ण केली आहे काय, असल्यास, त्याचे स्वरूप व तपशील काय आहे,
(३) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाविना घेण्याबाबत मा.न्यायालयाने आदेश दिल्यामुळे राज्यातील ओबीसी समाजात असंतोष निर्माण झाला असून मध्य प्रदेश सरकारच्या धर्तीवर तातडीने आयोगाचा परिपूर्ण अहवाल मा.न्यायालयाला सादर करुन ओबीसी आरक्षण टिकवण्याबाबत शासनाने कोणती दक्षता घेतली आहे व त्याचे स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, बिहार शासनाच्या धर्तीवर जातीनिहाय जनगणना (आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक लोकपाहणी) राज्यशासनाच्या खर्चाने करण्याबाबत शासनाने विचार केला आहे काय,
(५) असल्यास, ओबीसींचा मागासलेपणा तपासण्यारिता दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये आयोगास रुपये ८४.१८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून सदर कामकाजासाठी लागणारा अधिकचा निधी आयोगास आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन शासनाने दिले असून बाह्य स्त्रोतयंत्रणेद्वारे कंत्राटी मनुष्यबळ घेण्यास व त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(६) असल्यास, मध्य प्रदेश व बिहार शासनाच्या धर्तीवर आयोगाचा परिपूर्ण अहवाल मा.न्यायालयाला सादर करुन ओबीसी आरक्षण टिकविण्याबाबत शासन कोणत्या ठोस उपाययोजना करीत आहे वा करण्यात येणार आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२०-०८-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) समर्पित आयोगाने आपला अहवाल दिनांक ०७/०७/२०२२ रोजी सन्मा. सर्वोच्च न्यायालयात सादर केला आहे. त्यास अनुसरुन मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक २० जुलै, २०२२ रोजीच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्यात आल्या आहेत. सध्या प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

---

## पिंगळस (ता.कर्जत, जि.रायगड) येथील सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(३) १४३७३ (२५-०८-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंगळस (ता.कर्जत, जि.रायगड) येथील सरकारी सर्व्हे क्र. ५४/४ क्षेत्र ०-२३-० क्षेत्रापैकी व क्षेत्रासह खुला सार्वजनिक रस्ता पुर्वापार ग्रामस्थ, शेतकरी यांचा वापर वहिवाटीत असून पिंगळस स्मशानभूमीकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण करून दिलीप विष्णू कदम यांनी वहिवाटीत अडथळा निर्माण

केल्याप्रकरणी अनंत दिसले व अन्य ग्रामस्थांनी तहसिलदार, कर्जत व गटविकास अधिकारी, कर्जत आदींकडे तक्रारी केल्या असता सदरहू अतिक्रमण हटविण्याबाबत पिंगळस ग्रामपंचायतीला आदेश दिलेले असतानाही सदरहू अतिक्रमणे हटविण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंगळस ग्रामपंचायतीकडून सदरहू आदेशांची पूर्तता करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गटविकास अधिकारी, कर्जत तसेच तहसिलदार, कर्जत यांनी आदेश देऊनही ग्रामपंचायतीकडून सार्वजनिक वहिवाटेच्या रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यास दिरंगाई होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सार्वजनिक वहिवाटीच्या रस्त्यावर श्री.दिलीप विष्णू कदम यांनी केलेली अतिक्रमणे हटविण्याबाबत तसेच, सदरहू अतिक्रमणे हटविण्यासाठी विलंब करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचे विरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०६-२०२४) :** (१), (२), (३) व (४) श्री.अनंत गणपत दिसले, रा.पिंगळस, ता.कर्जत, जि.रायगड यांनी तहसिलदार, रायगड यांना मौजे पिंगळस, ता.कर्जत, जि.रायगड येथील सरकारी स.क्र.४५/४ क्षेत्र ०-२३.०० हे.आर मधून पिंगळस स्मशानभूमीकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर श्री.दिलीप विष्णू कदम यांनी केलेले अतिक्रमण हटविण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. सदर अर्ज प्राप्त झालेनंतर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी नोटीस बजावणी करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार, कर्जत यांचेकडे उक्त विषयाबाबत मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ चे कलम ५ अन्वये सुनावणी प्रक्रिया सुरु आहे. दोन्ही पक्षकरांकडून त्यांचा युक्तीवाद पूर्ण झाल्यानंतर प्रकरणी गुणवत्तेनुसार योग्य ते आदेश पारीत करुन संबंधितांना कळविण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील राजपुरी खाडीमध्ये सुवर्णदुर्ग शिपींग अँन्ड मरीन सर्व्हिसेस कंपनीचे तिकीट दर कमी करण्याबाबत

**(४) १६६४६ (२८-१२-२०२२) श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील राजापुरी खाडीमध्ये सुवर्णदुर्ग शिपींग अँन्ड मरीन सर्व्हिसेस व दिघी जलवाहतूक सोसायटी या दोन कंपन्यांची आगरदांडा-दिघी-आगरदांडा रो-रो सेवा सुरु आहे, परंतु सुवर्णदुर्गचे तिकीट दर हे दिघी जलवाहतूक सोसायटीच्या तिकीट दरापेक्षा जास्त असल्याने पर्यटनासाठी येणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारे नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने (मेरीटाईम बोर्ड) सुवर्णदुर्ग कंपनीस माहे डिसेंबर, २०२० मध्ये फक्त तीन महिन्यांसाठीच तिकिट दरवाढ करण्याची परवानगी दिलेली असताना कंपनीने मागील दीड वर्षापासून ते आजतागायत दरवाढ कमी केलेली नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेरीटाईम बोर्डाच्या प्रशासन अधिकाऱ्यांकडे त्याबाबत तक्रारी करुनही कार्यवाही होत नसल्यामुळे सदर तिकिट दरवाढ ही मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून रायगड (ता.मुरुड व श्रीवर्धन) जिल्ह्यामध्ये सुरु असणाऱ्या फेरी बोटीचा आढावा घेऊन फेरी बोटीचे दरवाढ कमी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे (०८-०८-२०२४) :** (१) होय.
(२) नाही.
आगरदांडा-दिघी-आगरदांडा या जलमार्गावरील सुवर्णदुर्ग शिपींग अँन्ड मरीन सर्व्हिसेस व दिघी जलवाहतूक सोसायटी या दोन्ही संस्थांचे तिकीट दर एकसारखे असावे म्हणून, देण्यात आलेल्या दरवाढीस स्थगिती देण्यात आलेली असून सद्य:स्थितीत दोन्ही संस्थांचे तिकीट दर एकसारखे आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जळगाव जिल्हा आरोग्य विभागात बायोमेडिकल साहित्याची नियमबाह्यरित्या खरेदी होत असल्याबाबत

**(५) १९२८१ (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जळगाव जिल्हा परिषद आरोग्य विभागात गत आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणावर नियमबाह्यरित्या बायोमेडिकल साहित्याची खरेदी झाली असून, सदर खरेदी एकाच एजन्सीकडून केली जात असल्याबाबत लेखा परीक्षणात आक्षेप घेण्यात आल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२७-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रस्तुत प्रकरणी जिल्हा मुख्य कार्यालय स्तरावरून खरेदी झाली नसली तरी जिल्हा स्तरावरून दिनांक ०९/०५/२०२३ च्या आदेशान्वये त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी अहवालामध्ये विविध प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर झालेल्या खरेदी विषयी जिल्हा स्तरावरून कोणतेही

आदेश दिले नसल्याचे चौकशी समितीस आढळून आले आहे. लेखापरिक्षण अहवालातील बायोमेडिकल वेस्ट साहित्याच्या खरेदीस अनुसरून असलेल्या एकूण १३९ लेखा आक्षेपांपैकी (वैधानिक-४४ व समवर्ती-९५) एकूण ८६ लेखा आक्षेप लेखापरीक्षकांकडून निकाली काढण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांचे मूल्यमापन करणेबाबत

**(६) १९७९५ (०४-०८-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून देशातील विद्यापीठांना अनुदान देण्यासाठी नॅक समितीमार्फत मूल्यांकन करण्यात येते व त्यांच्या दर्जाप्रमाणे अनुदान वितरित करण्याची शिफारस करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच धर्तीवर राज्यातील अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांचे मूल्यमापन करून अनुदान देण्यासाठी एक यंत्रणा उभी करण्याची मागणी विविध संघटनांनी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२५-०६-२०२४) :** (१) होय.
(२) अशा आशयाचे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील रुग्णालयांतील डॉक्टर्स, परिचारिका, वॉर्डबॉय इत्यादी आवश्यक पदांची भरती करण्याबाबत

**(७) १९८२६ (०८-०८-२०२३) श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ संसर्गामुळे आरोग्य सेवेचे महत्व अधोरेखीत झालेले असून माहे मे, २०२३ अखेर डॉक्टर्स, परिचारिका, वॉर्डबॉय इत्यादी रुग्णालयातील आवश्यक असणारी पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व संवर्गनिहाय किती पदे रिक्त आहेत, उपरोक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोरोना सारख्या भविष्यात उद्भवणाऱ्या आरोग्य विषयक आपत्तींचा सामना करण्यासाठी डॉक्टर्स, परिचारिका, वॉर्डबॉय इत्यादी रुग्णालयातील आवश्यक असणारी रिक्त पदे आरोग्य विभागामार्फत तातडीने भरण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०८-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) संवर्गनिहाय पदांचा तपशील खालील तक्त्यात नमूद केला आहे.

| संवर्ग | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|
| गट-अ (वर्ग-१) | १८०९ | ८४९ | ९६० |
| गट-अ (एस-२०) | ८४७५ | ७१०२ | १३७३ |
| गट-ब | २२७५ | १३०३ | ९७२ |
| गट-क | २४५९५ | १६१८६ | ८४०९ |
| गट-ड | ९२१३ | ५१६३ | ४०५० |
| एकूण | ४६३६७ | ३०६०३ | १५७६४ |

गट-अ ते गट-ड ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शालेय अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश करण्याबाबत

**(८) १९९२७ (०४-०८-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याबाबतचा कृषी विभागाचा प्राथमिक अहवाल शिक्षण विभागाने स्वीकारला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाचे स्वरूप काय व कृषी विषयाचा अभ्यासक्रमात समावेश होण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.दिपक केसरकर (२१-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शालेय अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश करण्याच्या अनुषंगाने ६ तज्ज्ञांची संयुक्त समिती गठीत करण्यात आली होती.

सदर समितीला साहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी कृषी महाविद्यालयातील १२ प्राध्यापकांची उपसमिती नियुक्त करण्यात आली होती.

सदर समिती उपसमितीमार्फत शालेय अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश करावयाच्या घटक व उपघटकांवर इयत्तावार सखोल चर्चा करून मसूदा सादर केला आहे.

समिती व उपसमिती यांनी तयार केलेला मसुदा संबंधित इयत्ता आणि संबंधित विषयामध्ये घेण्याबाबतचा निर्णय अभ्यासक्रम समिती तथा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे स्तरावर अभ्यासक्रमाची पुनर्रचना होईल तेव्हा घेण्यात यावा असा अभिप्राय समितीमार्फत देण्यात आला

आहे. त्यानुसार नवीन शैक्षणिक धोरणानुसार पुनर्रचित अभ्यासक्रमामध्ये कृषी विषयाचा समावेश करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

## जिल्हा परिषदांमधील कर्मचाऱ्यांनी शासनमान्य रुग्णालयातील घेतलेल्या उपचारांची संचिका पडताळणीसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठविणेबाबत

**(९) १९९९९ (०८-०८-२०२३) : श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदांमधील कर्मचाऱ्यांनी शासनमान्य रुग्णालयात उपचार घेतले असल्यास रुग्णाची संचिकाही पूर्ण पडताळणी प्रमाणपत्रासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडे पाठवावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेतील जिल्हा आरोग्य अधिकारी हे जिल्हा शल्यचिकित्सक समकक्ष पद असून संचिका जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे न पाठविता जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडेच पाठविण्याची मागणी म.राज्य कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाने शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी वित्त खात्याची मंजूरी असल्याच्या आदेशाची आवश्यकता असते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जिल्हा परिषदांमधील कर्मचाऱ्यांच्या सोईच्या दृष्टीने सदर कर्मचाऱ्यांनी शासनमान्य रुग्णालयांमध्ये उपचार घेतले असल्यास संचिका पूर्ण पडताळणी प्रमाणपत्रासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांचेऐवजी जिल्हा परिषदेतील जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठविणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१४-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) म.राज्य कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाने या विभागाकडे मागणी केल्याचे दिसून येत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील नियम क्र.८ नुसार जिल्हा परिषदांकडील कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देयक प्रतीपूर्ती बाबतीत संबंधित जिल्ह्याचा जिल्हा शल्यचिकित्सक हा प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी आहे.

तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी, १९९९ नुसार आजार प्रमाणित करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांना प्राधिकृत केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुक्ताईनगर, बोदवड, रावेर, सावदा (जि.जळगाव) येथील रुग्णालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) २०१२६ (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर, बोदवड, रावेर, सावदा (जि.जळगाव) येथील रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारिका, तंत्रज्ञ, परिचर, शिपाई अशी अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्याने रुग्णांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत नसल्याने आरोग्य विषयक समस्या निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मुक्ताईनगर, बोदवड, रावेर, सावदा (जि.जळगाव) येथील रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०८-०८-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुक्ताईनगर, बोदवड, रावेर, सावदा (जि.जळगाव) येथील रूग्णालयात वर्ग-२ ते वर्ग-४ ची रिक्त पदे कंत्राटी स्वरूपात भरण्यात आलेली असून दैनंदीन रूग्णालयीन सेवा वेळेवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सार्वजनिक आरोग्य विभागातील वर्ग-१ व वर्ग-२ ची रिक्त पदे भरण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याबाबत

**(११) २१०४२ (१५-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून अद्यापही पदभरती न करण्यात आल्याने वर्षानुवर्षे ग्रामपंचायतीत सेवा बजाविणारे कर्मचारी नोकरीच्या हक्कापासून वंचित राहिल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री महोदयांकडे दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन सादर केले असून, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १९ ऑगस्ट, २००५ रोजीच्या अधिसूचनेन्वये जिल्हा सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ ची कोणतीही पदे नामनिर्देशनाद्वारे भरावयाची असल्यास जिल्हा परिषदेशी संबंधित संवर्गात रिक्त घोषित केलेल्या एकूण पदांच्या १० टक्क्यांहून कमी नसतील इतकी पदे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून भरण्यास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या ग्रामविकास विभागाच्या पत्रानुसार सरळसेवा पदभरती, २०१९ च्या रिक्त पदाच्या अधिन राहून १० टक्के ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नियुक्त्या देण्यास मान्यता देण्यात आली असून, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या उक्त पत्राच्या अनुषंगाने सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून जिल्हा परिषदेतील वर्ग-३ व वर्ग-४ ची पदभरती करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१४-०८-२०२४) :** (१) होय.

(२) ग्रामविकास विभाग पत्र दिनांक १८/०२/२०२१ अन्वये सरळसेवा पदभरती २०१९ च्या रिक्त पदांच्या अनुषंगाने १० टक्के कोट्यातून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नियुक्त्या देण्यास मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग यांचेकडून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून ३ कनिष्ठ सहाय्यक व १ ग्रामसेवक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून महाबीज भात बियाणांच्या खरेदी प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) २१०४४ (१५-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून महाबीज भात बियाणांच्या खरेदी प्रक्रियेत गैरव्यवहार होत असल्याची लेखी तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडे माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०७-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय व्यवस्थापक महाबीज ठाणे यांच्या अहवालानुसार सदर प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली व परभणी जिल्ह्यातील ग्रामीण विभागात राज्य मार्ग, पाणंद रस्ते व इतर मूलभूत सुविधांकरीता निधीची आवश्यकता असल्याबाबत

**(१३) २१६२४ (०५-०१-२०२४) : श्री.विप्लव बाजोरिया** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली व परभणी जिल्ह्यातील ग्रामीण विभागात राज्य मार्ग, पाणंद रस्ते व इतर मूलभूत सुविधांकरीता मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ५ वर्षांमध्ये हिंगोली व परभणी जिल्ह्याच्या ग्रामीण विभागाच्या विकासाकरीता शासनाने अत्यंत कमी प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगोली व परभणी जिल्ह्यातील ग्रामीण राज्यमार्ग व इतर रस्ते याकरीता शासनस्तरावर रुपये २०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०५-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१८-१९ ते २०२२-२३ या ५ वर्षांच्या कालावधीमध्ये हिंगोली व परभणी या जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते/पूलांची कामे आणि मूलभूत सोयीसुविधांकरीता खालीलप्रमाणे निधी उपलब्ध झालेला आहे :-

| योजनेचे नाव | जिल्हा परिषद, हिंगोली (रुपये लक्ष) | जिल्हा परिषद, परभणी (रुपये लक्ष) |
|---|---|---|
| जिल्हा वार्षिक योजना (३०५४ व ५०५४) | ८७४२.१० | १२२२३.२६ |
| रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (३०५४-२४१९) | ४३६८.९५ | ४६३३.९६ |
| मुख्यमंत्री ग्राम सडक योजना | २३६८३.४० | ३३८०५.८४ |
| प्रधानमंत्री ग्राम सडक योजना | ८०७२.४८ | ७२७३.७५ |
| शेत पाणंद रस्ते योजना | १३३४२.५३ | ३७१२.१६ |
| गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे (२५१५) | ९९५४.०० | १२०७३.९९ |

तसेच यापुढेही ग्रामीण भागातील रस्ते/पूलांची कामे व गावांतर्गत मूलभूत सोयीसुविधांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यातील प्राथमिक विषय शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(१४) २२१७५ (०५-०१-२०२४) : श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ पेक्षा जास्त जिल्हा परिषदेत सर्वांना सरसकट प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून, उर्वरित जिल्ह्यात केवळ पदोन्नती देऊन वेतनश्रेणी देण्याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरटीई २००९ नुसार सर्व प्राथमिक पदवीधर विषय शिक्षकांना ग्रामविकास विभागाच्या दिनांक २२ मे, २००९ नुसार देय असणारी वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची मागणी विषय शिक्षक वेतनश्रेणी संघर्ष समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०६-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अशी कोणतीही मागणी ग्रामविकास विभागात प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याबाबत

**(१५) २२९०९ (३०-०५-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात सन २०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना अद्याप शासनाकडून नुकसानभरपाई देण्यात आली नसल्याने बाळापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी तहसिलदार, बाळापूर यांचेकडे शेतकऱ्यांना त्वरीत मदत देण्याबाबतचे निवेदन दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (२८-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यामध्ये सन २०२३ मध्ये अतिवृष्टीमुळे शेती/फळपिकांच्या झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने बाधित झालेल्या क्षेत्राचे सर्व्हेक्षण व पंचनामे करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर तलाठी, कृषी सहायक व ग्रामसेवक यांच्या संयुक्त पथकाव्दारे करण्यात आली असून ११८४३.०४ हे. आर. क्षेत्राचा अंतिम अहवाल शासनास सादर करण्यात आला होता.त्यानुषंगाने बाधित शेतकऱ्यांना निधीचे वाटप थेट लाभार्थी हस्तांतरण (DBT) पध्दती द्वारे सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) वन विभागातील वडखळ रेंजमध्ये रोजंदरीवर काम करणाऱ्या मजुरांना शासकीय सेवेत समाविष्ट करण्याबाबत

**(१६) २३२३३ (१७-०६-२०२४) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) वन विभागातील वडखळ रेंजमध्ये सन १९९० च्या दरम्यान रोजंदारी मजुरांना सेवेत नियमित करण्यासाठी वन विभागाविरुध्द औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे याचिका क्र. ६१३ /१९९१ दिनांक १ नोव्हेंबर, १९९१ अन्वये दाखल करण्यात आलेल्या खटल्याच्या निकालात मा.न्यायालयाने दिनांक ३१ मार्च, २००० रोजी मजुरांना शासकीय सेवेत नियमित करण्याबाबतचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाविरुध्द शासनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक ३ मे, २००२ रोजी याचिका क्र.३२५६/२००२ अन्वये दाखल केलेल्या रिट पिटीशनवर मा.उच्च न्यायालयाने दिनांक १५ जून, २०१८ रोजी पुन्हा मजुरांच्या बाजूनेच आदेश देऊन पाच वर्षे उलटूनही मा.न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करीत संबंधित मजुरांना शासनाने अद्याप सेवेत सामावून घेतलेले नसून कोणतेही लाभ दिलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मजुरांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लवकरात लवकर शासकीय सेवेत समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०२४) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

मा.औद्योगिक न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालयाच्या संबंधित दिनांक ३१/०३/२००० तसेच दिनांक १५/०६/२०१८ च्या आदेशानुसार Industrial Employment (Standing Orders) Act. १९४६ अंतर्गत Model Standing Orders मधील कलम ४(C) नुसार कायमस्वरुपी मजूर म्हणून अनुषंगिक सेवाविषयक लाभ मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील पशुधनास चारा टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(१७) २३५२२ (३०-०५-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील पशुधनास माहे एप्रिल, २०२४ पर्यंत पुरेल इतकाच चारा शिल्लक असताना व तालुक्याचे लागवड क्षेत्र एक लाख वीस हजार हेक्टर असताना पशुसंवर्धन विभागाने शासनाला तीन लाख ७३ हजार हेक्टर क्षेत्रावर मका लागवड असल्याचे सांगून शासनाला चुकीची माहिती दिली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याअनुषंगाने शासनाने सविस्तर चौकशी करून पुन्हा असे प्रकार घडणार नाहीत यासाठी शासनाने कोणती दक्षता घेतली वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यभरात चारा टंचाई असणाऱ्या सर्व तालुक्यात चारा छावण्या उभारण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत काय,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०६-२०२४) :** (१), (२), (३) व (४) नाही.

राज्यातील पशुधनास आवश्यक चारा उपलब्ध व्हावा यासाठी सन २०२३-२४ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रुपये ३९.८८ कोटी निधी खर्च करून, १७३.१० मे. टन वैरण बियाणांचे वितरण करण्यात आलेले आहे.

मदत व पुनर्वसन विभागाचा शासन निर्णय दिनांक ५ जून, २०२४ अन्वये राज्यातील खरीप हंगाम २०२३ करीता घोषित दुष्काळी तालुक्यात दिनांक ३१/०८/२०२४ पर्यंत अथवा पावसाचे प्रमाण समाधानकारकरित्या होई पर्यंत आवश्यक त्या ठिकाणी चारा डेपो उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे.

---

## शहापूर (जि.ठाणे) येथील भात खरेदी केंद्रातील अधिकाऱ्याने बनावट पावत्यांच्या आधारे कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(१८) २३७७१ (३०-०५-२०२४) : श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील आदिवासी विकास महामंडळाकडून सन २०२३ च्या डिसेंबर महिन्यापासून ११ केंद्रांतर्गत रुपये २८ कोटी रुपयांची भात खरेदी केले असता, भात खरेदी केंद्रातील केंद्रप्रमुख अधिकाऱ्याने शेतकऱ्यांना बनावट पावत्या देऊन शेतकऱ्यांकडून प्रतिक्विंटल रुपये १५०० घेऊन केंद्रप्रमुख पैसे घेऊन फरार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आदिवासी विकास महामंडळाच्या नाशिक आयुक्त कार्यालयातून आलेल्या लेखापालांच्या पथकाने सील केलेल्या गोदामांची तपासणी केली असून तपासाअंती बोगस भात खरेदीचा अहवाल दिला जाणार असल्याचे संबंधित शेतकऱ्यांना आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भात खरेदी मध्ये शेतकऱ्यांच्या झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या फसवणुकीबाबत दोषी केंद्रप्रमुखावर कारवाई करुन भात खरेदीत फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांच्या भाताचे पैसे मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित (२७-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

शहापूर (जि.ठाणे) येथील उपप्रादेशिक कार्यालय, शहापूर अंतर्गत असलेल्या ११ खरेदी केंद्रांवर माहे मार्च, २०२४ अखेर रुपये ४३.६३ कोटी रुपयांची भात खरेदी करण्यात आली असून, चरीव भात खरेदी केंद्राच्या केंद्रप्रमुखांनी बनावट पावत्या वापरल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी सनदी लेखापाल पथकाने तपासणी केली असून तपासणी अहवाल अद्याप महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळास प्राप्त झालेला नाही.

(३) सदर प्रकरणी प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांनी चौकशी केली असून, चौकशीदरम्यान अनियमितता आढळून आल्याने चरीव भात खरेदी केंद्राच्या केंद्रप्रमुखांवर पोलीस ठाणे किन्हवली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या गाईच्या दुधात दरवाढ करण्याबाबत

**(१९) २३७९१ (३०-०५-२०२४) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गाईचे दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति लिटर पाच रुपयांचे अनुदान देण्याची योजना जाहीर करून तीन महिन्यांचा कालावधी होऊनही अद्याप शेतकऱ्यांना या दूध योजनेचे अनुदान मिळाले नसल्याचे माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी दुधाचा किमान दर रुपये ३८, त्यानंतर ऑगस्टमध्ये रुपये ३४ इतका दर निश्चित केला होता, परंतु आता गाईच्या दुधाच्या दरात रुपये २५ इतकी झालेली घट, पशुखाद्यांच्या किंमतीत होणारी वाढ, दुष्काळामुळे चाऱ्यांची कमी उपलब्धता, दुधाचे प्रलंबित अनुदान इ. मुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना प्रलंबित अनुदान देण्यासाठी तसेच राज्यातील गाईचे दूध कमी असल्याने संकरित गायीच्या आणि देशी गायीच्या दूध उत्पादनात व दरात वाढ करण्यासाठी आणि आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०६-२०२४) :** (१), (२), (३) व (४) दूधाचे दर हे प्रामुख्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारातील दूध भुकटी व बटरचे दर यावर अवलंबुन असतात. दुधाच्या पुष्ट काळात दूधाचे दर घसरतात, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी शासन बाजारात वेळोवेळी हस्तक्षेप करुन दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून शासनाने राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दूधाला प्रतिलिटर रुपये ५/- अनुदान देण्याचा निर्णय घेतला. सदर योजना २ महिन्यांसाठी राबविण्यात आली होती.

दूध अनुदान योजनेतंर्गत आतापर्यंत रुपये २३०.५० कोटी इतके अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यावर थेट वर्ग करण्यात आले आहेत.

---

## नंदुरबार जिल्ह्यात देवस्थान इनामी जमिनीचे नियमबाह्यरित्या हस्तांतरण झाल्याबाबत

**(२०) २३८७१ (१८-०५-२०२४) : श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे. नंदुरबार शिवारातील सर्व्हे. नं. १८७ व सर्व्हे. नं. ६९ ही देवस्थान इनाम जमीन असून सन १९९१-९२ मध्ये श्रीराम मंदिराचे अर्चक यांना शासनाने सनदेप्रमाणे मंजूर केलेल्या जमिनीवर कालांतराने संरक्षित कुळ लागलेले असून दिनांक ३१ मे, १९९९ रोजी फेरफार नोंद क्र.१९०११ मध्ये टेनंसी केस क्र.०३/९८ मध्ये तहसिलदार, नंदुरबार यांनी दिनांक ३ मार्च, १९९९ रोजी आदेश पारित केल्याचे दाखून इनामी शेरा कमी केलेला असून माहिती अधिकारात सदर प्रकरणातील कागदपत्रे मागितली असता कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे तहसिल कार्यालयामार्फत लेखी कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळातच देवस्थान इनामी जमिनीला कुळ कायदा लागू होत नसताना सदर जमीन ही नियमबाह्यरित्या हस्तांतरण केली असून सद्य:स्थितीत कोणताही नजराणा न भरता सदर जमीन वर्ग-१ मध्ये परावर्तीत करून जिल्ह्यातील दोन भूमाफिया व त्यांच्या परिवाराच्या नावे असल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दिनांक ३० जुलै, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित व्यक्तींवर उचित कारवाई करून जमीन देवस्थानच्या नावे पूर्ववत करण्याबाबत तसेच सदर प्रकरणी दोषी असलेल्या भूमाफिया व संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) मौजे नंदुरबार येथील स.नं. १८७ व ६९ या जमिनी देवस्थान इनाम जमिनी असून त्यावर फेरफार नोंद क्र.१४६९, दिनांक २८/०७/१९४८ अन्वये कूळ लागल्याचे दिसुन येते. तथापि, सदरची जमीन ही देवस्थान इनाम वर्ग ३ ची असल्याने सदरच्या कुळास मालकी हक्क प्राप्त होत नसल्याने सदर कुळास खरेदी विक्री किंवा हस्तांतरण करण्याचे अधिकार प्राप्त होत नाहीत. सदरची जमीन ही देवस्थान इनाम वर्ग - ३ अशी धारणाधिकाराची राहते.

सदर जमीन बिनशेती करतेवेळी व भोगवटादार वर्ग-१ करतेवेळी कोणतीही नजराणा रक्कम शासन जमा करणेत आलेली नाही.

देवस्थान इनाम जमिनी अवैध पध्दतीने हस्तांतरण केली असल्याने सदर जमीन पूर्ववत देवस्थानच्या नावावर व्हावी अशी मागणी करुन मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.७९८५/२०२१ तसेच जनहित याचिका क्र.पीआयएल १०१/२०२१ याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर